3266

जा.क्र.नियंत्रण/प्रा.अ.नियुक्ती/विकाबावी/सन २०१६
कार्यालय, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
तालूका उस्मानाबाद दिनांक :- १७ /१०/२०१६

वाचा : क्र. महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ७३ (आय) (२) (१) व ७७ अ (२) (३).

प्रस्तावना :

ज्याअर्थी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म. बावी, ता. जि. उस्मानाबाद ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या खालील नियम १९६१ मधील तरतूदीनुसार नोंदविण्यात आलेली असून जिचा नोंदणी क्रमांक २०२८२ , दिनांक २८/०९/१९५९ असा आहे आणि,

ज्याअर्थी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म. **बावी**, ता. जि. उस्मानाबाद या संस्थेची व तिच्या उपविधीची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ मधील तरतूदीनुसार करण्यात आलेली आहे आणि जिचे व्यवस्थापन उक्त नमूद अधिनियम, नियम व उपविधीतील प्रचलित तरतूदीनुसार करण्याची जबाबदारी सदरहू संस्थेच्या समितीवर आहे.

ज्याअर्थी सदरहू संस्थेच्या समितीची पाच वर्षाची अवधी दिनांक **०८/०४/२०१५** रोजी समाप्त झालेली आहे. सदरची अवधी समाप्त होण्यापुर्वी वैधानिक तरतूदीनुसार समितीची निवडणूक घेण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करुन नविन समिती घटीत करणेची जबाबदारी सध्याच्या कालबाह्य काळजीवाहू समितीवर होती. सदरहू समितीने निर्धारीत निवडणूक निधीची रक्कम मुदतीत मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या खात्यावर जमा केलेली नाही. त्यामुळे सदरहू संस्थेच्या समितीची निवडणूक मुदतीत घेता आलेली नाही.

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (आय) (२)(१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला कळविण्यात बुध्दीपुरस्पर कसूर केली असेल तर आणि त्यामुळे कोणत्याही कारणास्तव मुदत संपण्यापुर्वी समितीची निवडणूक घेता आली नसेल तर, समितीचे सदस्य त्यांचे अधिकारपद क ७७ अ (२) (३) मध्ये योजिल्या प्रमाणे कार्यवाही करील अशी तरतूद आहे.

ज्याअर्थी उक्त संस्थेच्या समितीचा अवधी दिनांक **०८/०४/२०१५** रोजी समाप्त झालेली आहे. सदरचा अवधी समाप्त होवून एक वर्ष सात महीन्याचा काळ लोटला आहे. सदरचा कालबाह्य अनाधिकृत समिती अद्यापही बेकायदेशीररीत्या कार्यरत आहे. सदर समितीने वरील प्रमाणे निवडणूक घेण्यास निर्धारीत निवडणूक निधीची व्यवस्था मुदतीत केलेली नाही. त्यामुळे मुदतीत निवडणूक घेता आलेली नाही

याच कारणास्तव सदर संस्थेची कालबाह्य अनाधिकृत समिती निष्काषीत करणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यासाठी नोटीस काढणे, ती प्रसिध्द करणे व कालबाह्य अनाधिकृत समितीचे म्हणणे ऐकुन घेण्याची जरुरी वाटत नाही. सदर संस्थेस शासनाचे ४ % पीक प्रोत्साहन अनुदान देण्यात आलेले आहे. तसेच सदरची संस्था उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म. उस्मानाबादची ऋ णको आहे. असे असताना देखील सदरहू संस्थेच्या समितीच्या समितीने मुदतीत समितीची निवडणूक घेण्यास कसूर केलेली आहे. सदर संस्थेवर कालबाह्य अनाधिकृत समिती कार्यरत आहे ते बेकायदेशी आहे याची खात्री झाल्यावरुन ती कालबाह्य अनाधिकृत समिती निष्काषित करुन तात्काळ त्या संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (दोन) (३) नुसार प्राधिकृत अधिकारी नेमणूक करणे क्रमप्राप्त झाले आहे याची पूर्ण खात्री झालयावरुन उक्त कायद्यान्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

मी, एच.पी.कांबळे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,तालुका उस्मानाबाद, मला महाराष्ट्र सहंकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ७७ अ (दोन) (३) अन्वये प्राप्त झालेल्या वैधानिक अधिकराचा वापर करुन उक्त प्रस्तावनेत नमूद करण्यात आलेल्या कारणास्तव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म. **बावी**, ता. जि. उस्मानाबाद या संस्थेची कालबाह्य अनाधिकृत समिती या आदेशान्वये निष्कासित करीत असून सहा महिन्यात या सस्थेच्या समितीची निवडणूक घेण्याची व्यवस्था करुन नविन समिती घटीत करणेसाठी सदरहू संस्थेवर प्राधिकृत अधिकारी म्हणून श्री. डी.एम.मुंगळे, शाखाधिकारी, उस्माााबाद जि.म.स.बँक म. उस्माााबाद,शाखा उस्मानाबाद मार्केट यार्ड, यांची नेमणूक करीत आहे. सदरची नेमणूक त्यांनी सदरहू संस्थेचे व्यवस्थापन हाती घेतल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याकरीता राहील.

असा आदेश अजा दिनांक १७/१०/२०१६ रोजी माझी सही व कार्यालयाच्या मुद्रेनिशी दिला असे.

(एच. पी. कांबळे) 17/10/2016
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, तालूका उस्मानाबाद.**

**प्रत,**

१. व्यवस्थापक / सचिव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म. **बावी**, ता. जि. उस्मानाबाद, यांना देऊन कळविण्यात येते की, संस्थेचे यापूढील सर्व व्यवहार नियुक्त प्राधिकृत अधिकारी यांच्या स्वाक्षरीनेच करावे आणि सहा महिन्यात संस्थेच्या समितीची निवडणूक घेण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करुन नविन समिती घटीत करावी. त्यानुषंगाने केलेल्या कामकाजाचा अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करावा

२. श्री. डी.एम.मुंगळे, शाखाधिकारी, उस्माााबाद जि.म.स.बँक म. उस्माााबाद,शाखा उस्मानाबाद मार्केट यार्ड तथा प्राधिकृत अधिकारी, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म. **बावी**, ता. जि. उस्मानाबाद यांना देऊन कळविण्यात येते कि, हे आदेश प्राप्त होताच तात्काळ सदर संस्थेचे व्यवस्थापन हाती घेऊन आपल्या स्वाक्षरीने सर्व व्यवहार करावे आणि सहा महिन्यात समितीची निवडणूक घेण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करुन नवीन समिती घटीत करावी. त्यानुषंगाने केलेल्या कामकाजाचा अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करावा.

३. माजी चेअरमन / उपाध्यक्ष/ समिती सदस्य विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म. **बावी**, ता. जि. उस्मानाबाद यांना देवुन कळविण्यात येते कि, त्यांनी त्यांच्या कालबाह्य पदाचे अनाधिकृत कामकाज त्वरीत सोडावे व संस्थेचे यापुढील सर्व व्यवस्थापन उक्त नियुक्त प्राधिकृत आधकाऱ्याकडे तात्काळ सुपूर्द करावा.

४. शाखाधिकारी, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि.शाखा **उस्मानाबाद मार्केट यार्ड** ता. जि. उस्मानाबाद यांना देवून कळविण्यात येते कि, आपल्या बँक शाखेतील उक्त संस्थेच्या बँक खातेवरील यापूढील व्यवहार प्राधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीनेच करावा.

**<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर.</u>**

१. मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,लातूर.
२. मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद.
३. मा.जिल्हा विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था, उस्मानाबाद.
४. सरव्यवस्थापक, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि.मु.का.उस्मानाबाद

**सहाय्यक निबंधक** 17/10/2016
**सहकारी संस्था, तालूका उस्मानाबाद**